ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# An International Multidisciplinary Quarterly Research Journal

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Volume - VII, Issue - III, July - September - 2018
ISSN 2277 - 5730

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. अलका अनिल मानकर

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

सक्षमीकरणासमोरील प्रश्न : स्त्री भ्रूणहत्या एक कलंक

Editor : Vinay S. Hatole

[illegible]
[illegible], Near University Gate,
[illegible] (M.S.) 431 004
Mob. No. [illegible]
Tel. No.: (0240) [illegible]
[illegible]


Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VII, Issue-III
July - September - 2018
Marathi Part - III / IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | गांधीजींच्या सत्याग्रह या विषयांचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. पवार बंडू थारवा** | १-६ |
| २ | माझा रशियाचा प्रवास : इंडो - सोव्हिएट संस्कृतीचे अवलोकन<br>**प्रा. विठ्ठल गुंडे** | ७-९ |
| ३ | मोगल स्त्रियांचा राजकीय सहभाग (इ.स.१५२६- इ.स.१६०५)<br>**डॉ. स्मिता शिंदे** | १०-१५ |
| ४ | संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि न्या. एस. के. दार आयोग<br>**डॉ. भाऊसाहेब यशवंत जाधव** | १६-१९ |
| ५ | मांग जातीची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थिती<br>**प्रा. निलेश देगांवकर** | २०-२६ |
| ६ | सक्षमीकरणासमोरील प्रश्न : स्त्री भ्रूणहत्या एक कलंक<br>**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर** | २७-३२ |

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ६. सक्षमीकरणासमोरील प्रश्न : स्त्री भ्रूणहत्या एक कलंक

**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर**
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा (रेल्वे), जि. बुलडाणा.

**प्रस्तावना**

प्राचिन काळात स्त्रीला महत्वाचे स्थान होते. आपल्या देशामध्ये गार्गी, मैत्रेयी किंवा अशा अनेक महिला होउन गेल्या ज्यांना सन्मान्य स्थान प्राप्त झाले होते. याकाळात सामान्यपणे महिलांच्या बाबतीत सन्मानाची भावना होती. या संबंधीचा उल्लेख मनुस्मृतीमध्ये आढळतो.

यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता:
यत्रैतास्तु न पुज्यंते सर्वास्तत्राफला: क्रिया!!

स्त्री भ्रूणहत्य या नावातच विषयाचे गांभीर्य समजून येते. २१ व्या शतकातील या विज्ञान युगात अतिशय प्रगत समाज बघायला मिळतो पण या समाजाला एका समस्येने कीड लावलेली आहे आणि ती आणि किड एवढीशी नसून तिने संपूर्ण समाज पोखरुन काढला आहे.

स्त्री भ्रुणहत्या म्हणजे काय? तशी यबाबत सर्वानाच सर्वानाच माहिती आहे. पोटात फुलणारया नाजुक कळीला ती उमलण्या आधीच रुढी—परंपरा पुढच्या पिढीला जाणीव होते.

स्त्री भ्रूणहत्या म्हणजे समाज व्यवस्थेला लागलेला महाकलंक आहे आणि गंगा—गोदावरीच्या पाण्यात स्नान करुन तो नष्ट करता येत नाही, त्याची कटु फळे सर्वानाच चाखावी लागतात. मुळात विषयाची व्याप्ती जगभरच आहे पण दक्षिण—आशियायी विकसनशील राष्टांत याचे स्वरुप महाभयंकर आहे. असे म्हटले जाते की, 'सैषा प्रसन्न वरदा नृणां भवति मुक्तये!'

स्त्री जर समाधानी असेल तर ती समाजाला अनुकुल ठरते व मनुष्याच्या स्वातंत्र्याचे कारणही!

पण बहुतेक समाजाला या उक्तीचा विसर पडला आहे.

गर्भलिंगचाचणीवर कठोर नियंत्रणे आणून आणि स्त्री—भ्रूणहत्येविरुध्द व्यापक मोहिमा आखूनदेखील राज्यातील स्त्री—पुरुष प्रमाणातील विसंगती वाढतच चालली असून, देशातील अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात स्त्रीयांचे प्रमाण घसरतच असल्याचे स्पष्ट झाले आहेच सहा वर्षापर्यतच्या वयोगटातील स्त्री—पुरुषाचे प्रमाण २००१ मध्ये दर एक हजार मुलांमागे ९१३ मुली इतके होते. २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण दर एक हजार मुलांमागे ८८३ मुली इतके घसरले आहे.

सहा वर्षे वयोगटातील स्त्री—पुरुष संख्येने हे प्रमाण पाहता मुलीला जनम नाकारण्याची मानसिकता रोखण्याच्या उपाययोजना गतिमान करण्याची गरज नव्याने आधोरेखित झाली आहे. राज्याच्या लोकसंख्येचा एकत्रित विचार करता गेल्या दशकभरात राजयातील स्त्रीयांचे प्रमाण एक हजार पुरुषांमागे ९२२ वरुण ९२५ पर्यत वाढले असले तरी राष्ट्रीय पातळीवरील प्रमाण पाहता , ग्रामीण भागांप्रमाणेच शहरी भागातही चिंताजनकरीत्या खालावत असल्याचेही स्पष्ट झाले आहे. २००१ ते २०११ या दहा वर्षात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील या प्रमाणात तीव्र घट झाल्याची कबुली सरकारने दिली आहे.



212

देशातील २१ राज्यांतील स्त्री–पुरुष प्रमाण महाराष्ट्रहुन अधिक असून अत्तरेकडील पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश बिहार, अरुणाचल आणि गुजरात आदी काही राज्य महाराष्ट्रहुनही मागे आहे. केरळमध्ये स्त्रीयांचे प्रमाण पुरुषापेक्षाही अधिक म्हणजे दर एक हजार पुरुषामागे एक हजार ८४ स्त्रीया आहेत. राष्ट्रीय पातळीवर स्त्री–पुरुष लोकसंख्याचा विचार करता, महाराष्ट्र २२ व्या स्थानावर आहे.

राज्यातील रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग जिल्हयांत स्त्रीयांचे प्रमाण पुरुषापेक्षा अधिक म्हणजे दर एक हजार पुरुषांमागे अनुक्रमे एक हजार १२३ व एक हजार ३७ इतके असल्याने राज्यातील या गुणोत्तराची सरासरी काहीशी सावरली आहे.

राज्यातील शंभर टक्के शहरीकरण झालेल्या मुंबईच्या उपनगरात तर हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ८३८ तर शहर भागात ८५७ पर्यंत खालावले आहे. ठाणे जिल्हयात हे प्रमाण ८८० इतके आहे.

**०–६ वर्ष वयोगटातील स्त्री–पुरुष प्रमाण**

जळगाव जिल्हा ९२२, औरंगाबाद जिल्हा : ९१७ बीड जिल्हा:९१२, लातूर जिल्हा: ९२४ उस्मानाबाद जिल्हा: ९२०, पणे जिल्हा:९१०

कुटुंबामध्ये मुलगा झाला तर आनंदोत्सव होतो. हत्तीवर बसून साखर वाटली जाते. सर्वत्र आनंदाचे वातावरण असते मात्र मुलगी झाल्यास ते कुटुंब निराशेच्या खाईत लोटले जाते. 'मुलगी झाली हो!' म्हणून आंबट चेहरयाने सांगितले जाते. मुलीस जन्म देणारया आईचा छळ होतो.

पाहता मुलापेक्षा मुलगीच बरी असते, कारण ती सासर नि माहेर दोन्हीकडे पकाश देण्याचे काम करते. हिच आपल्या आईवडिलांच्या सुखदु:खत समरस होत असते. मुले मात्र आपआपल्या संसारातच दंग असतात, म्हातारपणी त्यांच्याकडे लक्ष द्यायला मुलांना मुळीच वेळ नसतो. तरीही आपण म्हणतो मुलगाच बरा, असे का व्हावे? ही समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

समाजाची, लोकांची धारणा असते की, मुलगा हा वंशाचा दिवा असतो. मुलगी वंशाख दिवा होउच शकत नाही. पण हा समज चुकिचा आहे. आजकाल मुलीसुध्दा आईवडिलांच्या अत्यंसंस्कारात कामी येत आहे. तसेच मुलीसुध्दा मुलांच्या तुलनेत अधिक कार्यक्षम आहेत. सर्वच क्षेत्रात आज मुली मुलापेक्षाही चमकत आहेत व आईवडिलांचे व सासरचे नाव नव्हे तर देशाचे नाव उज्वल करत आहेत. असे असताना मग स्त्रीहत्येचे पाप का करावे? त्यांच्या जन्माला येण्याचा अधिकार का म्हणून हिरावून घ्यायच? काही कळत नाही. यामुळे मात्र राज्यातील मुलींचे प्रमाण घटत आहे, हे कोणच्या कसे लक्षात येत नाही?

आज राज्यातील मुलींच्या जन्माचे प्रमाण हजारी ९२२ एवढे आहे आणि बृहन्मुबईसारख्या शहरात तर हेच प्रमाण हजार मुलांमगे ७३३ एवढे कमी झाले आहे. हे वृत्तच किती धक्कादायक आहे. आणि हे प्रमाण असेच घटत राहिलेतर गंभीर समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. मुलीच्या या घटत्या संख्येला शासनाने आळा घालणसाठी कायदा तयार केला आहे. पण त्यापेक्षा स्वयंस्फूर्तीने महिलांनीच या कामी पुढे यायला हवे.

जशी मी स्त्री आहे या जगातील सुखदु:खे, मौजमजा करण्याचा मला अधिकार आहे मग तो माझ्याच मुलीला का असू नय? मुळात तिचा जन्मायचा अधिकार हिरावून घेण्याचा अधिकार मला कोणी दिला? शिवाय योग्य कारणाशिवाय केलेली भ्रुणहत्या हा खुनाचाच प्रकार नव्हे काय? या सर्व बाबींवर आत्मचिंतन करणे आज प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य बनले आहे आणि प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य बनले आहे आणि हे जर एकदा



13

त्या स्त्रीला पटले तर तिने अधिक कणखर होउन 'मी माझ्या मुलीला जन्म देणारच, तिला मुलासारखे निर्भयतेने मुक्तपणे जीवण जगू देणार, उच्चशिक्षण देवून स्वयंभू बनविणार' हा निश्चय एकदा झाला कि, आज सर्वच क्षेत्रात पुढे असलेल्या महिलामध्ये कदाचित आपल्या मुलीचाही नंबर असू शकेल.

**कारणे**

**१) कुटुबांची संरचना**

शहरीकारणाबरोबरच भ्रूण हत्येस कुटुंबाची संरचना जबाबदार आहे. 'मुलगी नको' या विषयावर संपूर्ण कुटुंब एकसारखा विचार करीत असे. तशाच प्रकारचा विचार करण्यास संपूर्ण कुटुंब एकसारखा विचार करीत असे. तशाच प्रकारचा विचार करण्यास संपूर्ण कुटुंब तयार करते. त्यामुळे सर्व लोक मुलींच्या आईस गर्भ पाडण्यास तयार करतात.

**२) हुंडा प्रथा**

टनेक कारणांपायी महत्वाचे असलेल्या हुंडा याही कुप्रथेमुळे मुलीला जन्म देण्यास आई वडील धजावत नाही. आपल्या समाजात सुरुवातीला काही वर्गापुरती मर्यादित असलेली ही कुप्रथा महिलांच्या अस्तित्वाला हानिकारक ठारलेली ही कुप्रथा आज सर्वमान्य होवून स्त्रीभ्रूण हत्येस जबाबदार कारण ठरली आहे. वधुकडील मंडळींनी (पित्यांनी ) वराकडील मंडळीस त्यांच्या मागणीनुसार विवाह प्रसंगी काही वस्तु, रक्कम अथवा मौल्यवान भेट दिल्यास हुंडा म्हटले जाते. आज अनेक स्त्रियांचे बळी या कुप्रथेने घेतले आहे. ही प्रथा समाजाला कलंकित करणारी ठरली आहे. मुलगी जन्मल्यानेतर तिच्या विवाहाच्या वेळेस हुंडा द्यावा लागेल, या भितीपोटी तिला गर्भातच मारुन टाकल्या जाते.

**३) गर्भलिंग परीक्षण सुविधेची उपलब्धी**

स्त्रीने गभधारण केल्यानंतर गर्भलिग परिक्षणाची सुविधा सहज उपलव्ध असलेली दिसते. कायद्याने हा गुन्हा असला तरी चोरुन—लपून गभ्रलिंग परिक्षण करुन गर्भ स्त्र कि परुषाचा आहे हे जाणून घेतले जाते, ही वास्तविकता आहे. अर्थात स्त्रीचा गर्भ असल्यास त्याची हत्या केली जाते.

थोडक्यात उपलब्ध वैज्ञानिक सुविधेचा दुरुपयोग स्त्री हत्येसाठी मोठया प्रमाणात कारणीभूत आहे.

**४) सामाजिक कारणे**

स्त्री—भ्रुणहत्या होण्यामागे काही सामाजिक कारणे आहेत. अदा. पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्था, पुरुषप्रधान मानसिकता, पारंपारिक विचारधारा, कुटुंबातील महिलांचे दुय्यम स्थान, विवाहसंस्थेचे दोष, विवाह संस्थेतील अनिष्ठ रुढी, प्रथा, हुंडा पध्दती, निरक्षरता इत्यादी अनेक कारणांमुळे अनेक मुलींच्या जन्म एकाच घरात होणे नाकारले जाते.

**५) आर्थिक कारणे**

आर्थिक दुर्बलता, गरीबी यामुळे मुलीचे शिक्षण, संगोपन, आरोग्य याकडे दुर्लक्ष केले जाते. शेवटीि खर्च करुन हाती काय लागणार? मुलगी शेवटी दुसरीकडे जाणार 'बेटी तो पराया धन' असे म्हटले जाते. पहिली बेटी तुप रोटी, परंतू बेटी तिखट रोटी ! डोळयात अश्रु आणणारी अशी मानसिकता असल्यामुळे देखील भौतिकवादी जगात मुलगी ही मुल्यहीन समजली जाते व स्त्री भ्रुणहत्या होते.

**६) सामाजिक असुरक्षितता**

एकूणच असे आढळून येते की, आज कुटंबात, समाजात मुली सुरक्षीत राहिल्या नाही. आई वडील असुरक्षिततेच्या दहशतवात वावरत असतात. मुलींच्या दृष्टीने भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. असेच त्यांना वाटते, घराबाहेर मुलगी पडली म्हणजे त्यांचा जीव टांगनीला लागतो आणि परत येईपर्यंत ते डोळयात प्राण आणून तिची वाट बघत राहतात. मुलगी म्हणजे घराची इज्जत, प्रतिष्ठा अशी तिच्या भोवती तयार झाल्यामुळे संकट ओढवून घेण्यापेक्षा मुलगीच नसलेली बरी असा विचार समाजात पसरत आहे.

**७) आर्थिक परावलंबन**

जन्माला आल्यावर पित्याच्या लग्नानंतर नवरयाच्या आणि म्हातारपणी मुलाच्या असे स्त्रीला आयुष्यभर कुणाच्यातरी बंधनातच राहवे लागते. त्यामुळे तिच्यामधे देखील परावलंवनाची भावना वाढत आहे. घरी राहणारया महिल्या इतरावर आर्थिकदृष्टया अवलंबून आहेत. पण नौकरी करणारया अधिकाअधिक महिलांना देखील आपल्या इच्छेनुसार खर्च करण्याची परवानगी नसते.

ते स्वातंत्र्य त्यांना नाही. अशा आर्थिक परावलंबनामुळे मुलगी नकोशी वाटते.

**८) वंशाचा दिवाच**

अनेक कुटंबात मुल आई—वडीलांची सेवा करतांना दिसत नाहीत. मा—पित्यांच्या ठायी आपले कर्तव्य पार पाडतांना दिसत नाहीत. आज सामाजिक परिस्थितीत परिवर्तन होतांना दिसते. तसेच विचारातही परिवर्तन दिसते. मुलापेक्षा मुली अधिक भावनाशिल असतात. त्या आई—वडिलांना समजून घेतात विवाह नंतरही त्या आई—वडिलांची सेवा करण्यास तयार असतात. ऐवढे असून सुध्दा जास्तीत जास्त 'कुटुंबाला वंशाचा दिवाच'लागतो पणती चालत नाही. मुलांमुळे आपल्या वंशाचे सातत्य टिकुन राहते असे भारतीयांना वाटते. सुशिक्षीत स्त्री सुध्दा पहिला मुलगा होण्याचीच इच्छा ठेवते. कारण

अ) कुटंब मर्यादित ठेवते. कारण

ब) मुलीला जन्म दिल्यानंतर कुटुबात, समाजात आपला मान, सन्मान कमी होईल हा विचार असे कितीतरी कुटुंब समाजात पाहावयास मिळतात.

**९) गरिबी**

कुटुंबात जर मुलीची संख्या जास्त असेल व कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावलेली असेल तेव्हा ही स्त्रीभ्रुण हत्या केली जाते. कारण आणखी मुर्लीचा भार कुटुब सहन करु शकत नाही. मग घरातील इतर सदस्यांच्या दबावामुळे ती हे पाप करण्यास तयार होते.

**१०) स्त्री आत्मसन्मानाचा अभाव**

स्त्रीवर होणारा सर्व अत्याचार व तिच्या दु:स्थितीचे कारण म्हणजे तिच्या आत्मसन्मानाचा अभाव म्हणता येईल. स्त्री आत्मसन्मान इतक्या खालच्या स्तरावर गेला आहे. की नारीच नारीची दुश्मन झालेली आहे. आपल्या जातीसाठी इतका अपमान त्याची विचारधारा इतकी कुठीत झाली आहे. पुरुष एकटाच यासाठी अपराधी नाही. स्त्रीच्या सहयोगाशिवाय हे संभव नाही हे संभव नाही की, पुरुष या कुचक्राला पूर्ण करु शकेल.

स्त्री हीच जननी आहे, तिच सासु, ननंद आहे. प्रत्येक नाते तिच्याशी निगडीत आहेत. आपला आत्मसन्मान सध्या स्त्री विसरली आहे.



215

एका कवियत्रीने म्हटले आहे.

लेकीचा गं जलम ! भाडयाचा बईल
कधी इसावा हुईल ! दिवा ठाव
लेकीचा ग जलम ! देव देउनी चुकला
बैल घण्याला उपला ! जलमभरी

हया ओळीतून आत्मसन्मान हरविलेल्या स्त्रिचे मनोगत व्यक्त होते.

**उपाय**

**१) स्त्रीचे स्वावलंबन व शिक्षण**

स्त्रीमध्ये आत्मसयन्मान, शिक्षण व स्वावलंबन आणूनच स्त्री भ्रुण हत्या रोखता येईल. स्त्रिया केवळ शिक्षित होवून चालणार नाही. तिची इच्छा, मत, मस्तिष्क दुसरयाजवळ गहाण ठेवलेले नसावे, तिचे हे विचार स्वतःचे असावे, मुलगा असो किंवा मुलगी दोन मुलांचाच त्याचा छोटा परिवार असावा. त्यांच्या योग्यतेनुसार मुलांचा उदरनिर्वाह असावा. स्त्री आपले निर्णय घेण्यास स्वतंत्र असली पाहिजे. स्त्री इतकी समर्थ असते की, ती सर्वकाही सांभाळू शकते स्वतःचे निर्णय स्वतः न घेतल्यानेच तिची मानसिकता कमजोर झालेली असते. तिचे विचार इतके अमार्यादीत का आहे की स्वतः मजंबुत असुनही मनातील इच्छा मारुन ही ती मुलगी भ्रुण हत्येच्या पापातं सहभागी होते. स्त्री मधील आत्मसन्मान जागृत व्हायला पाहीजे व पहिले तीने स्वतःचा आत्मसन्मान केला पाहिजे. तेव्हाच ती समस्त नारी जातीचा सन्मान करेल तेव्हाच लोक तिचा सन्मान करतील. जर तीन ठरविले तर नवरा, सासु कोणीही तिच्यावर जास्त दबाव टाकून कन्या भ्रुण हत्यासारखे मोठे पाप ती करु शकत नाही. यासाठी शिक्षित मातेचे मोठे योगदान असावे. स्त्रीचे हदय आपल्या मुलामुलीसाठी एक शाळा आहे. जगाची जाणीव बालकात रुजविण्याचे काम माताच करते. स्वावलंवी माताचे विलक्षण गुण जीवनाच्या प्रत्येक परिस्थतीत आपले प्रभाव दाख़विते. आई बाळाला ९ महिने ९ दिवस गर्भात ठेवते व आपलया कुशीत ती वर्ष मात्र आपल्या चैतन्य व अचैतन्य कामामध्ये ती आपल्यासोबत असते.

आपल्या हदयात तेव्हापर्यत असते. जो पर्यत तिचे आयुष्य असते अशी महती असतांनाही तीने भ्रुण हत्येचा विचार मनात आणू नये.

**२) लिंग परिक्षणप्रतिबंध**

आपल्या म्हातारया आईवडिलांची जवाबदारी घेण्याइतपत महिलांना सक्षम बनविले पाहिजे. यादृष्टीने मूलीच्या सासरकडच्या लोकांची मनोधारणा बंदलणे जरुरीचे आहे. म्हातारपणच काठीचा आधार म्हणून मुलांकडे जे बघितले जाते आणि मुलगी म्हणजे परक्याचे ध नही समाजाची जी धारणा आहे त्या मनोभूमिकेत बदल होणे जरुरीचे आह. स्वयंसेवी संस्था सुध्दा ही समस्या निवारण करण्यासाठी महत्वपुर्ण महत्वाची भूमिका ठरते. मानवकलयाणाच्या दृष्टीने त्यांनी अशा कृत्यापासून दूर राहावे. डॉक्टरांना सरकारव्दारा प्रतिबंध सुध्दा करायला पाहिजे कि, त्यांनी गर्भाची स्वास्थ्याच्या दृष्टीनेच तपासणी करावी, लिंगपरिक्षणासंदर्भात अशी तपासणी करु नये. लिंगपरीक्षण करणारया डॉक्टरांवर कठोर दंडात्मक कारवाई व्हायला हवी.

भारतातील स्त्रियांना समानतेची वागणूक देउन स्त्रियांच्या संख्येत वाढ करणे आवश्यक आहे. समाज व देशाच्या विकासासाठी व निर्माण झालेल्या संकटातून बाहेर पडण्यासाठी महिलांना चांगले जीवन जगणे,

संधी प्राप्त करुन देणे व त्यांचे प्रमाण वाढवणे काळाची गरज आहे. त्यासाठी कडक कायद्यांची अंमलबजावणी बराबरच आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरुन प्रशासनामार्फत गर्भलिंग निदान करणारया केंद्राना लगाम लावणे आवश्यक केल्यास मुलींचे प्रमाण वाढु श्केल. समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. टाळणारी केंद्र प्रशासनामार्फत चालवावी. त्यासाठी जागरुक समाज निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

**३) मानसिकता बदण्यांची गरज**

स्त्री— पुरुष प्रमाणात संतुलन निर्माण करण्याचे कार्य एकटया दुकटयाचे नाही. त्यासाठी व्यापक समाजजागृतीची, जनजागृतीची गरज आहे. स्त्री भ्रणहत्या रोखण्याचे कार्य माझे आहे.

समाजातील प्रत्येक जबाबदार घटकाला वाटले पाहिजे. कुटुंब, समाज, देशपातळीवर स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. त्यात युवक—युवती गट, महिला मंडळे, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, समाजातिल संघटकना, शिक्षक, राजकीय कार्येकर्ते सामाजिक कार्येकर्ते, नेते, समाजातील कार्यक्षम व कार्यप्रवण गट इत्यांदीनी स्त्री भ्रुणहतया रोखण्यासाठी सर्वतोपरी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन उद्दिष्ट पूर्ती केली पाहिजे. त्यांत कन्या झालेल्या मातेचे स्वागत, स्त्री भ्रुणहत्या या विषयावर घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र, तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रमांचे विविध स्तरावर आयोजन करावे. शेवटी जन्माला येणारा प्रत्येक जीव मग तो कन्या असो वा पुत्र त्याला जीवन जगण्याचा व फुलण्याचा अधिकार आहे.

यासाठी गरज आहे जागृतीची, मानसिकता बदण्याची. प्रत्येकाने स्त्रियांचे कार्य जाणण्याची यामध्ये स्त्रियांना स्वकुटुंबातून, पुरुषाकडून प्रोत्साहन तर मिळाले पाहिजेच पण त्याबरोबर स्वत: स्त्रियाने सुध्दा स्वत:च्या अधिकाराला ओळखून स्त्रीजन्म पुरुषांच्या नसून पुरुषांच्या सहकार्यासाठी आहे. अशी मानसिकता बनवण्याची गरज आहे. ज्या स्त्रियांनी संधी मिळाली त्यांनी स्त्री उत्कार्षाविषयी वैरभावना न ठेवता स्त्रियांना सोबत घेवून चालण्याची, अधार देण्याची गरज आहे. देशाच्या सर्वच स्तरामध्ये स्त्री कार्य करु शकते. यामध्ये सर्वात महत्वाच म्हणजे स्त्रियांनी स्वत: जागृत होवून अधिकराचा वापर केला पाहिजे. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा वाढेल व स्त्री पुरुष भेद कमी होवून स्त्री भ्रुणहत्या करण्यापासून लोकांची भुमिका बदलेल व स्त्रियांच प्रमाण वाढून समतोल निर्माण होईल.

**संदर्भग्रंथ**

१. दृ लोकसंख्या शास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण
२. स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने प्रतिमा प्रकाशन पुणे
३. साळुंखे आ.ह. ''हिंदू संस्कृती आणि स्त्री लोकवाडमय गृह मुंबई
4- P Sindhuja "Economic emplwerment of women through SELF – HELP GROUPS.